जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२
शाखा उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी अधिकारी (भूसंपादन), अमरावती
दुरध्वनी क्रमांक - ०७२१-२६६१६०२ फॅक्स क्र. ०७२१-२६६२८४३
Email :- amravatilao2014@gmail.com Website:-http://amravati.nic.in

क्र.अ.का/प्र.अ./भूसंपादन/कावि/ ०८ /२०१९२० दिनांक :- ०२/०१/२०

## आदेश

**वाचा** :- १.उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),ल.सिं.कामे,अमरावती यांचे पत्र क्र.मंअ/ उपजिभूसं/ ल.सिं.कामे/कावि ३९०/२०१९, दि. २१/१२/२०१९

२.नविन भूसंपादन कायदा २०१३ चे कलम १९ (७) चे परंतुक

**विषय** :- **गणेशपुर-घाटलाडकी रस्ता प्रकल्प ता.चांदूर बाजार जि.अमरावती** मधील प्रकरणामध्ये भूसंपादन कार्यवाही करीता मुदतवाढ मिळणेबाबत.
(भु.स.प्र.क्र. २१/४७/२०१०-११ मौजा रेडवा ता.चांदूर बाजार जि.अमरावती )

ज्याअर्थी, भूसंपादन प्रकरण क्र. २१/४७/२०१०-११ मौजा रेडवा ता.चांदूर बाजार जि.अमरावती या प्रकरणामध्ये कलम ११ ची अधिसूचना अंतिम प्रसिध्दी दिनांक २५/०१/२०१९ रोजी करण्यात आली असुन सदर प्रकरणामध्ये संयुक्त मोजणी अहवाल उपअधिक्षक भूमीअभिलेख, चांदूर बाजार यांचे कडुन प्राप्त झाला होता. सदर्हु प्रकरणामध्ये संपादित जमीनीचा मोबदला तसेच भूसंपादन कार्यवाही करीता लागणारा निधी रक्कम रु.१८,११,७००/- मागणी करण्यात आलेला आहे. संबंधित रक्कम यंत्रणेकडुन अप्राप्त आहे. नविन भूसंपादन कायद्यानुसार प्रकरणामध्ये कलम १९ घोषणापत्र प्रसिध्दी करणेचे अगोदर एकुण मागणीच्या ३०% निधी भूसंपादन अधिकारी यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. सदर प्रकरण दिनांक २५/०१/२०२० ला व्यपगत होत आहे. तसेच कलम १९ घोषणापत्र १२ महिन्याचे आत प्रसिध्द करणे आवश्यक असल्याने

ज्याअर्थी, कलम ११ प्रसिध्दीनंतर कलम १९ ची प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. कलम ११ अधिसूचना प्रसिध्दीनंतर कलम १९ ची मान्यता १२ महिन्याचे आत होणे आवश्यक आहे. तथापि, संबंधित यंत्रणेकडुन आवश्यक निधी प्राप्त न झाल्याने कलम १९ अधिसूचना विहित मुदतीत प्रसिध्द होणे शक्य नसल्याने

ज्याअर्थी, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अंतर्गत कलम १९ ची घोषणा करणेस्तव कलम १९(७) चे तरतुदीमधील परंतुकानुसार समुचित शासन कलम ११ चे प्रसिध्दीनंतरचे १२ महिन्यांचा कालावधी संपलेनंतर पुढील १२ महिन्यांसाठी योग्य कारणांसह पुढे वाढवू शकते, अशी तरतुद आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची दिनांक ११/०९/२०१५ चे राजपत्रकात प्रसिध्द अधिसूचना क्र.संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७(भाग२)/अ-२, दिनांक ११/०९/२०१५ नुसार जिल्हाधिकारी यांना १०००० हे.आर क्षेत्रापर्यंतचे क्षेत्रापेक्षा जास्त नसलेला भूसंपादनासाठी समुचित शासन म्हणून घोषित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नमुद सर्व बाबीमुळे प्रकरणामध्ये मुदतवाढ मिळणे आवश्यक असल्याने संबंधित उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), ल.सिं.कामे, अमरावती यांचेकडून कलम १९ चे प्रसिध्दीकरीता मुदतवाढ मिळणेकरीता विनंती करण्यात आली आहे.

त्याअर्थी, आता, उपरोक्त प्रकरणांमध्ये वरीलप्रमाणे, विनंती केल्यानुसार व उक्त वस्तुस्थितीनुसार भूसंपादन अधिनियम २०१३ अंतर्गत कलम १९ ची घोषणा प्रसिध्द करणेस्तव कलम १९(७) अंतर्गत तरतूदीनुसार भूसंपादन कार्यवाही करीता समुचित शासन म्हणून कलम ११ चे प्रसिध्दीनंतरचे १२ महिन्यांचा कालावधी संपल्यानंतरचे पुढील दिनांक २५/०१/२०२० नंतर १२ महिन्यांच्या कालावधीकरीता मुदतवाढीस मंजूरी प्रदान करण्यात येत असून त्याअनुषंगाने प्रकरणामध्ये पुढील कार्यवाही करण्यात यावी.

समुचित शासन तथा
जिल्हाधिकारी अमरावती

प्रति,
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
ल.सिं.कामे,अमरावती

<u>प्रतिलिपी</u> :- १. मा.विभागीय आयुक्त.अमरावती यांना माहिती करीता सविनय सादर.
२. जिल्हा पुनर्वसन अधिकारी,अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.
३. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांना माहिती तसेच निधी त्वरीत उपलब्ध करुन देणेचे निर्देशासह कार्यवाही करीता.

स्वा/-
समुचित शासन तथा
जिल्हाधिकारी अमरावती

!! प्लास्टीकचा वापर टाळूया !!